# बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम

# कार्यकारी सारांश

**बहुवर्षीय वीजदर चौकटी अंतर्गत आर्थिक वर्ष २००८-०९ करिता**
**वार्षिक कामगिरी चा आढावा, आर्थिक वर्ष २००७-२००८ मधील**
**खर्चाचे अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २००९-२०१० करिता**
**वार्षिक महसुली आवश्यकता आणि वीजदर निर्धारणासाठी**
**महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे**
**बेस्ट उपक्रमाने सादर केलेली याचिका.**

# कार्यकारी सारांश

## प्रस्तावना:

बेस्ट उपक्रमाकडून मुंबई बेट शहरामधील वीजग्राहकांना १०० वर्षापेक्षा अधिक कालावधीपासून कार्यक्षमतेने आणि विश्वासार्हतेने विद्युत पुरवठा करण्यात येत आहे. तत्कालीन बॉम्बे इलेक्ट्रीक सप्लाय आणि ट्रामवेज कंपनीने १९०५ या वर्षापासून शहरामध्ये विद्युत पुरवठा करण्यास सुरुवात केली. १९२६ या वर्षापर्यंत सदर कंपनी त्यांच्या वीजग्राहकांना वीज वितरण करण्याकरिता स्वतः विद्युत निर्मिती करीत होती. त्यानंतर, टाटा इलेक्ट्रीक कंपनी यांनी बेस्ट उपक्रमाला विद्युत पुरवठा करण्यास सुरुवात केली. १९४७ या वर्षामध्ये महानगरपालिकेने सदर कंपनी (म्हणजे, बॉम्बे इलेक्ट्रीक सप्लाय आणि ट्रामवेज कंपनी) आपल्या ताब्यात घेतली.

वीज पुरवठयामध्ये कमीत-कमी व्यत्यय आणि योग्य वीजदाब तसेच वाजवी दराने विद्युत पुरवठा करण्याकरिता बेस्ट उपक्रम भारतामध्ये प्रसिध्द आहे. तसेच, विद्युत पुरवठा वितरण प्रणालीमध्ये निर्माण झालेल्या कोणत्याही बिघाडाच्या बाबतीमध्ये विद्युत पुरवठा त्वरित पूर्ववत करण्याकरिता सुध्दा बेस्ट उपक्रमाची ख्याती आहे. मागील ६० वर्षांच्या कालावधीमध्ये विद्युत उपकेंद्राच्या संख्येमध्ये २४७ वरुन २०१७ वाढ झाली आहे. तसेच, भूमिगत तारखंडाच्या लांबीमध्ये १२६३ कि.मीटर्सवरुन ९५२८ कि.मीटर्स एवढी, मार्गप्रकाश दिव्यांमध्ये २,२१५ पासून ४०४८४ एवढी वाढ झाली आहे. बेस्ट उपक्रमाकचे सुमारे ९.४४ लाख वीज ग्राहक आहेत.

बेस्ट उपक्रमाची सातत्याने एकंदरित चांगली कामगिरी विचारात घेता बेस्ट उपक्रमाच्या सर्वागींण उत्कृष्ट कामगीरीचा गौरव करताना कॉन्सील ऑफ पावर युटिलिटीज, नवी दिल्ली यांनी “ज्युरी ॲवार्ड“ (इंडियन पॉवर ॲवार्ड- २००८) देऊन उपक्रमाचा गौरव केला आहे.

## बहुवार्षिक वीजदर (एमवायटी) प्रणाली तत्त्वानुसार सादर करण्यात आलेली माहिती

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने, एमईआरसी (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ अंमलात आणला असून सदर विनियम राज्यामधील सर्व विद्युत पुरवठा वितरण परवानेधारकांना लागू आहे. ह्या विनियमानुसार, विद्युत पुरवठा उपयोगिता संस्थांना २००८-२००९ या चालू वित्तीय वर्षाकरिता वार्षिक कामगिरी आढावा (एपीआर) आणि २००९-१० या आगामी वित्तीय वर्षाकरिता सुधारित एकूण महसुली आवश्यकता (एआरआर) याचिका दाखल करणे आवश्यक असून ज्यामुळे २००९-१० या वित्तीय वर्षाकरिताच्या ऊर्जेच्या किरकोळ विक्रीकरिताची आकारणी निश्चित करण्याकरिता आधारभूत होईल.

## २००७-०८ या वर्षाच्या लेखांच्या प्रत्यक्ष स्थितीचे सादरीकरण

### विक्री :

वित्तीय वर्ष २००७-०८ चा वार्षिक आढावा व वित्तीय वर्ष २००८-०९ च्या बेस्टचे वीजदर निर्धारीत याचिकेवर मा.आयोगाचे दि.६ जून २००८ च्या आदेशामध्ये वीज ग्राहक व विद्युत विक्रीतील मागील वाढ गृहीत धरून बेस्टला वित्तीय वर्ष २००७-२००८ साठी विद्युत विक्री ही ४२३९ एम.यु एवढी तत्वत: मान्य केली आहे. तथापी वित्तीय वर्ष २००७-०८ मध्ये प्रत्यक्ष विक्री ही ४०२३.९४ एम. यु.एवढी झाली आहे. देयक आर्वतनाच्या (सायकल)पध्दतीत एप्रिल २००७ पासून बदल केल्यामुळे, एप्रिल २००७ मध्ये अंदाजीत ८४.३ एम.यु एवढी

विक्री अंतर्भूत आहे. वित्तीय वर्ष २००७-०८ या मागील वर्षाच्या अंदाजीत विक्रीचे पूर्नविलोकनाच्या वेळी समायोजन केले आहे. यामुळे समायोजीत विक्री ही ३९३९.७ एम.यू.(४०२४ - ८४.३ एम यू) एवढी आहे.

**वितरण हानी :**

दूरदर्शी जालव्युह आरेखन, जालव्युहामध्ये सुधारणा,साधन सामग्रीच्या हानी लक्षात घेऊन उत्तम दर्जाविषयी आग्रह, इत्यादीसारख्यां विविध उपाययोजनांसह साधनसामग्रीवरील इष्टतम भार आणि सदोष वीजमापके बदलणे तसेच वाढती दक्षता आणि चोरी तपास मोहिम यात वाढ करून उपक्रमाने कमी वितरण हानीचे लक्ष्य साध्य केले आहे. २००७-०८ या वित्तीय वर्षाकरिता ११.०० टक्के या मान्यतापात्र हानीऐवजी प्रत्यक्ष वितरण हानी १०.३८ टक्के झाली आहे.

**वित्तीय वर्ष २००७-०८ करिता ऊर्जा संतुलन खालीलप्रमाणे :-**

| तपशील | वित्तीय वर्ष २००७-०८ याकरिता प्रत्यक्ष |
|---|---|
| विक्री (एमयू) | ४०२४ |
| वजा : समायोजन (एमयू) | ८४.३ |
| एकूण विक्री (एमयू) | ३९३९.७ |
| वितरण हानी (%) | १०.३८% |
| ऊर्जा आवश्यकता (एमयू) टी ॲन्ड डी इन्टरफेज | ४३९६ |
| पारेषण हानी (%) | **४.५४%** |
| एकूण ऊर्जा खरेदी (एमयू) | ४६०५.९५ |

**उर्जा खरेदी:**

आयोगाने त्यांच्या २००७-०८ या वर्षाकरितांच्या उपक्रमाच्या वार्षिक कामगिरी आढाव्यावर आणि २००८-०९ या वित्तीय वर्षाकरिताच्या वीजदर निर्धारित याचिकेवर दिनांक ०६जुन २००७ च्या आदेशान्वये तात्पुरत्या मान्यतेनुसार प्रक्षेपित केलेल्या विक्रीपेक्षा २००७-०८ या वर्षामधील प्रत्यक्ष विक्री ७.०५ टक्यांनी कमी झाली. त्याच प्रमाणे तुलनात्मक दृष्ट्या वीज खरेदी ही ७.९८ टक्यांने वित्तीय वर्ष २००७-०८ मध्ये कमी झाली आहे. आयोगाने वित्तीय वर्ष २००७-०८ साठी वीज खरेदी ही ५००५.३८ एम यू एवढी मान्य केली परंतु प्रत्यक्षात ४७१५.७४ एम यू एवढी वीज खरेदी झाली आहे. यापैकी १०९.७९ एम. यू एवढी उर्जा बेस्टच्या वतीने टी पी सी यांनी निर्माण करून विकली. त्यामुळे बेस्ट ग्राहकासांठी निव्वळ आवश्यकता पारेषण व वितरण यांचा (ईन्टरफेजकडे) ४६०५.९५ एम.यु. एवढी होती.

## २००७-०८ ह्या वित्तीय वर्षामधील कालावधीकरिता मान्यतापात्र व प्रत्यक्ष वीज खरेदीची तुलना

| तपशील | आदेशानुसार (युनिट) | आदेशानुसार ऊर्जा खरेदी खर्च | प्रति युनिट | एकूण युनिट | प्रत्यक्ष ऊर्जा खरेदी खर्च | प्रति युनिट | युनिट बिलमधील बदलाची टक्केवारी | प्रति युनिट खर्चातील बदलाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (एमयू) | रु.कोटी | | (एमयू) | रु.कोटी | | | |
| टाटा पॉवर कंपनी-ऊर्जा निर्मिती - प्रत्यक्ष स्थितीच्या सादरीकरणासह | ४१४३.०४ | १४२६.१० | ३.४४ | ४०८६.२८ | १४८१ | ३.६२ | -१.३७% | ५.०३% |
| टाटा पॉवर कंपनी-ऊर्जा निर्मिती ( अल्प मुदत ) | ८२२.३५ | ४५२.२९ | ५.५० | ५१६ | ४०२.४९ | ७.८० | -३७.२५% | २९.४९% |
| नवीकरणक्षम ऊर्जा स्त्रोत (आरपीएस) | ४० | २० | ५.०० | ३.६७ | १.६७ | ४.५५ | -९०.८३% | -९.८८% |
| एमएससीडीसीएलला भरण्यात आलेला राखीव आकार. | | ११४.६३ | | | ११४.६३ | | | |
| एमएससीटीसीएलला भरण्यात आलेला पारेषण आकार. | | ९७.६ | | | ९७.६ | | | |
| एसएलडीसी आकार | | ०.८ | | | ०.८ | | | |
| डीएसएमच्या खर्चामधील घट | | -५.३९ | | | ० | | | |
| टीपीसीचा मागील वर्षाचा इंधन समायोजन आकार | | १२३.७ | | | १२३.७ | | | |
| इंधन समायोजन आकाराची कमी झालेली वसुली | | ८ | | | ० | | | |
| **एकूण** | **५००५.३९** | **२२३७.७३** | **४.४७** | **४६०५.९५** | **२२२१.८९** | **४.८२** | | |

**<u>मान्यताप्राप्त ऊर्जा व प्रत्यक्ष ऊर्जा खरेदी खर्चाची तुलनात्मक सूची.</u>**

वर दर्शविलेल्या टी.पी.सी.(जी) उर्जा खरेदी खर्चात रू.११५.२४ कोटी एवढा इंधन समायोजन खर्च अंर्तभूत आहे.

**<u>पारेषण आकार:</u>**

वित्तीय वर्ष २००७-०८ चा वाषिक कामगिरी आढावा व वित्तीय वर्ष २००८-०९ च्या बेस्टचे वीजदर निर्धारीत याचीकेवर मा. आयोगाचे दि. ६ जून २००८ च्या आदेशामध्ये पारेषण आकार म्हणून रू.९७.६ कोटी एवढे तात्पुरत्या स्वरूपात मान्य केले आहे. प्रत्यक्ष खर्च ही ९७.०६ कोटी एवढाच आहे.

**राखीव आकार (स्टॅन्ड बाय आकार):**

वित्तीय वर्ष २००७-०८ चा वाषिक कामगिरी आढावा व वित्तीय वर्ष २००८-०९ च्या बेस्टचे वीजदर निर्धारीत करण्याच्या याचीकेवर मा. आयोगाने दि. ६ जून २००८ च्या आदेशामध्ये वित्तीय वर्ष २००७-०८ करीता राखीव आकार म्हणून रू.११४.६३ कोटी एवढे तातपुरत्या स्वरूपात मान्य केले आहे. प्रत्यक्ष खर्च रू ११४.६३ कोटी एवढाच आहे.

**एसएलडीसी आकार:**

वित्तीय वर्ष २००७-०८ चा वाषिक कामगिरी आढावा व वित्तीय वर्ष २००८-०९ च्या बेस्टचे वीजदर निर्धारीत याचीकेवर मा. आयोगाचे दि. ६ जून २००८ च्या आदेशामध्ये वित्तीय वर्ष २००७-०८ करीता वितरण आकार म्हणून रू.०.८० कोटी एवढे तातपुरत्या स्वरूपात मान्य केले आहे. प्रत्यक्ष खर्च हा रू .०.८० कोटी एवढाच आहे.

**प्रवर्तन व देखभाल खर्च :**

प्रवर्तन व देखभाल खर्चामध्ये पुढे नमूद केल्यानुसार, कर्मचारी खर्च, प्रशासकीय व सर्वसाधारण (ए ऑण्ड जी) खर्च व दुरुस्ती आणि देखभाल (आर ऑण्ड एम) खर्च याबाबींचा समावेश आहे :

**२००७-०८ या वित्तीय वर्षामधील कालावधीकरिताचा प्रवर्तन व देखभाल खर्च (रु. कोटींमध्ये)**

| तपशील | वित्तीय वर्ष २००७-०८ | |
|---|---|---|
| | मान्यताप्राप्त | प्रत्यक्ष खर्च |
| कर्मचाऱ्यांकरिता खर्च | १२८.१५ | १५०.३५ |
| प्रशासन व सर्वसाधारण खर्च | ८१.९१ | ७६.२६ |
| दुरूस्ती व देखभाल खर्च | २५.९३ | ३०.९४ |
| प्रवर्तन व देखभालीकरिताचा एकूण खर्च. | २३६ | २५७.५५ |

**कर्मचाऱ्याकरीता खर्च:**

उपकमाच्या विद्युत पुरवठा उद्योगामध्ये काम करीत असणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता दिनांक ०१.०४.२००६ पासून दिनांक ३१.०३.२००९ पर्यंतच्या कालावधीकरिता बॉम्बे इलेक्ट्रिक वर्कर्स युनियन यांच्याबरोबर दिनांक ०७.११.२००७ रोजी करण्यात आलेला करार आणि बेस्ट समितीचा दिनांक १०.१०.२००७ चा ठराव बृ.स.ठ.क.३४७, अनुसार वित्तीय वर्ष २००७-०८ मध्ये उपकमातील कर्मचाऱ्यांच्या वेतन तडजोड करारामुळे कर्मचाऱ्यांच्या खर्चामध्ये वरिलप्रमाणे वाढ झालेली आहे.

**प्रशासकीय व सर्वसाधारण खर्च:**

वित्तीय वर्ष २००४-०५ या वर्षामध्ये खर्चात वाढ ही नवीनक्षम उर्जा स्त्रोत आकाराची देय रक्कम महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरणाला केल्यामुळे आहे.

**दुरूस्ती व देखभाल खर्च**:

मेन्स ॲन्ड एरियल या शिर्षकाखाली कमी खर्चाचे अनुमान केल्याने दुरूस्ती व देखभाल खर्चात यावर्षी थोडी वाढ झाली आहे. तथापी वित्तीय वर्ष २००७-०८ मधील हा खर्च वित्तीय वर्ष २००६-०७ पेक्षा कमी आहे.

**आयकर:**

आयकर कायद्याच्या कलम १०(२०) अन्वये स्थानिक प्राधिकरणाचे उत्पन्न वगळ्यात आले आहे.

**वित्तीय वर्ष २००७-०८ साठी भांडवलीकरण (रू. कोटी मध्ये)**

वितरण जाळे वाढविण्याची मोठी कामे बेस्ट उपक्रमाने हाती घेतली आहेत. बेस्ट उपक्रमाच्या वीजग्राहकाना कार्यक्षमतेने व विश्वासार्हतेने वीज पुरवण्यासाठी केलेली गुंतवणूक ही बेस्टच्या या प्रयत्नाचा भाग आहे. वित्तीय वर्ष २००७-०८ मध्ये बेस्टने आयोगाच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन केले आहे आणि आयोगाने तात्पुरत्या स्वरूपात मान्यता दिलेल्या खर्चापेक्षा अधिक खर्च यशस्वीरीत्या या कामाकरता करण्यात आला आहे.

**२००७-०८ या वित्तीय वर्षामधील कालावधीकरिताचा भांडवली खर्च (रु. कोटींमध्ये)**

| अनु.क्र. | तपशील | आदेशानुसार | प्रत्यक्ष |
|---|---|---|---|
| १. | भांडवलीकरण | ८९.८८ | १५६.१५ |

**घसारा:**

बेस्ट उपक्रमामध्ये वर्षाच्या सुरवातीस वापरात असणाऱ्या स्थिर मालमत्यावर स्ट्रेट लाईन कार्यपद्दती अनुसार घसारा आकारण्यात येतो. कंपन्यामध्ये अनुसरण्यात येणाऱ्या पद्दतीनुसार बेस्ट उपक्रमाची वित्तीय कार्यपद्दती अंवलबण्यात येत नाही.

म्हणून वार्षिक महसूली आवश्यकतेमधील घसाऱ्याच्या बाबतीत उपक्रमाकडून वित्तीय वर्ष २००७-०८ या वर्षामध्ये आगाऊ रक्कमेसंबंधी कोणताही दावा करण्यात आलेला नाही. आयोगाने तातपुरत्या स्वरूपात रू ४१.६४ कोटी घसारा म्हणून मान्य केले पण प्रत्यक्ष घसारा हा रू ४०.३९ कोटी एवढा येत आहे.

**घसाऱ्या अंतर्गत आगाऊ रक्कम:**

या तरतुदी अंतर्गत बेस्टने घसाऱ्या अंतर्गत आगाऊ रक्कम वार्षिक महसुली आवश्यकतामध्ये कोणताही दावा केला नाही.

**बुडित येणी निर्लेखित करणे** :-

वित्तीय वर्ष २००७-२००८ चा वार्षिक कामगिरी आढावा व वित्तीय वर्ष २००८-२००९ च्या बेस्टचे वीजदर निर्धारित याचिकेवर मा. आयोगाचे दिनांक ६ जून, २००८ च्या आदेशान्वये बुडित येणी म्हणून रु.०.०६ कोटी एवढे तात्पुरत्या स्वरुपात मान्य केले आहे,पण प्रत्यक्षात बेस्टने वित्तीय वर्ष २००७-२००८ मध्ये फक्त रु. ०.०४ कोटी एवढेच बुडित येणी निर्लेखित केली आहे.

**भांडवली कर्जावरील व्याज** :-

बेस्ट उपक्रमातर्फे अंतर्गत निधीतून आणि अंशतः बाहेरील स्त्रोतांकडून खर्चाकरिता निधी उभारण्यात येतो. बेस्ट उपक्रमाने सार्वजनिक कर्जे, मेगासिटी प्रकल्पाकरिता मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणचे कर्ज, जिल्हा नियोजन विकास परिषद कर्ज आणि गतिमान ऊर्जा विकास व सुधारण कार्यक्रमांतर्गत कर्जे घेतली आहेत. वित्तीय वर्ष २००७-२००८ मध्ये व्याज म्हणून एकूण रु.७.९७ कोटी एवढ्या रकमेचे प्रदान करण्यात आले.

**खेळत्या भांडवलावरील व्याज:**

वित्तीय वर्ष २००७-२००८ मध्ये खेळत्या भांडवलावरील व्याज एकूण रु.१९.५२ कोटी आहे. वित्तीय वर्ष २००७-०८ मध्ये खेळत्या भांडवलावरील एकूण व्याज प्रमाणकानुसार रू.१.१९ कोटी आहे.

**वीजग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज** :-

आयोगाच्या दिनांक ६ जून, २००८ रोजीच्या वीजदर निर्धारित आदेशात मान्य केल्याप्रमाणे वीजग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज रु.६% एवढे विचारात घेतले आहे. वित्तीय वर्ष २००७-०८ या कालावधीत वीजग्राहकांची सुरक्षा ठेव रू.२१४.०३ कोटी एवढी होती व वीजग्राहकांच्या सुरक्षा ठेवी वरील व्याज रू.१२.८४ कोटी एवढे होते.

**भागभांडवलावरील परतावा** (RoE) :-

वित्तीय वर्ष २००७-२००८ चा वार्षिक कामगिरी आढावा व वित्तीय वर्ष २००८-२००९ च्या बेस्टचे वीजदर निर्धारित याचिकेवर मा. आयोगाने दिनांक ६ जून, २००८ च्या आदेशान्वये भागभांडवलावरील परतावा म्हणून रु.१०१.१५ कोटी एवढे तात्पुरत्या स्वरुपात मान्य केले आहे, पण प्रत्यक्षात वित्तीय वर्ष २००७-२००८ मध्ये परतावा रु.१०२.९१ कोटी एवढे आहे.

**अंतर्गत निधीवरील परतावा** :-

वित्तीय वर्ष २००७-२००८ चा वार्षिक कामगिरी आढावा व वित्तीय वर्ष २००८-२००९ च्या बेस्टचे वीजदर निर्धारित याचिकेवर मा. आयोगाचे दिनांक ६ जून, २००८ च्या आदेशान्वये अंतर्गत निधीवरील परतावा म्हणून रु.८.३७ कोटी एवढे तात्पुरत्या स्वरुपात मान्य केले आहे, पण प्रत्यक्षात वित्तीय वर्ष २००७-२००८ मध्ये परतावा रु.११.०७९ कोटी एवढे आहे.

**बिगर प्रशुल्क (नॉन-टेरिफ) उत्पन्न** :-

वित्तीय वर्ष २००७-२००८ साठी मा. आयोगाने तात्पुरत्या स्वरुपात रु.४६.१८ कोटी एवढे बिगर प्रशुल्क उत्पन्न म्हणून मान्य केले होते, पण प्रत्यक्षात हे उत्पन्न रु.५१.६६ कोटी एवढे आहे. ही वाढ मुख्यतः जाहिरातीच्या वाढीव उत्पन्नामुळे झाली आहे. (एकूण वाढीव रु.५.४८ कोटी उत्पन्नापैकी जाहिरातीमुळे रु.३.७४ कोटी एवढे जमा झाले आहे.)

**वित्तीय वर्ष २००७-२००८ साठीच्या वार्षिकमहसुली आवश्यकतेचा घोषवारा (रु.कोटींमध्ये)**

| अनु. क्र. | तपशील | वित्तीय वर्ष २००७-०८ | |
|---|---|---|---|
| | | मान्यताप्राप्त | प्रत्यक्ष |
| १) | ऊर्जा खरेदी खर्च (@) | १९००.९९ | १८८५.१५ |
| २) | प्रवर्तन व परिरक्षण खर्च | २३५.९८ | २५७.५५ |
| २)-अ | कर्मचारी खर्च | १२८.१५ | १५०.३५ |
| २)-ब | प्रशासन व सामान्य खर्च | ८१.९१ | ७६.२६ |
| २)-क | दुरूस्ती व देखभाल खर्च | २५.९२ | ३०.९४ |
| ३) | घसाऱ्यासाठी घेतलेल्या अग्रीम रकमेसह घसारा | ४१.६५ | ४०.३९ |
| ४) | दीर्घ मुदतीच्या कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ४.७९ | ७.९७ |
| ५) | खेळत्या भांडवलावरील व्याज (प्रमाणकानुसार) | ४.६४ | १.२६ |
| ५.१) | खेळत्या भांडवलावरील व्याज (प्रत्यक्ष प्रमाणकानुसार) | ०.० | १८.२६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६) | वीजग्राहक सुरक्षा ठेवींवरील व्याज | १२.४६ | १२.८४ |
| ७) | बुडित कर्जे निर्लेखन | ०.०६ | ०.०४ |
| ८) | आयकर | ०.०० | ०.० |
| ९) | एमएसईटीसीएल यांना देय असलेला पारेषण आकार | ९७.६१ | ९७.६१ |
| १०) | एमएसईडीसीएल यांना देय असलेला राखीव आकर. | ११४.६३ | ११४.६३ |
| ११) | वार्षिक एसएलडीसी शुल्क व आकार | ०.८० | ०.८० |
| १२) | टीपीसी ला देय केलेला इंधन समायोजन आकार | १२३.७० | १२३.७० |
| १३) | अंतर्गत निधीवरील व्याज म्हणून परतावा | ८.३७ | ११.०७९ |
| १४) | भागभांडवलावरील परतावा | १०१.१५ | १०२.९१ |
| १५) | **एकूण महसुली आवश्यकता** | २६४६.८३ | २६७४.१९ |
| १६) | वजा : बिगर प्रशुल्क उत्पन्न. | ४६.१८ | ५१.६६ |
| १७) | **वार्षिक महसुली आवश्यकता** | २६००.६५ | २६२२.५३ |

**(@) उर्जा खरेदी खर्चाचा सविस्तर तक्ता**

| **तपशील** | **रू. कोटी** |
|---|---|
| आयोगाने मान्य केलेला एकूण खर्च **(अ)** | २२३७.७३ |
| वजा: खर्च वेगळा दर्शविलेला आहे. **(ब)** | |
| एमएसईटीसीएल यांना देय केलेला पारेषण आकार | ९७.६१ |
| राखीव आकर. | ११४.६३ |
| वार्षिक एसएलडीसी शुल्क व आकार | ०.८० |
| टीपीसी ला देय केलेला इंधन समायोजन ञकार | १२३.७० |
| **एकूण उर्जा खरेदी केलेला खर्च (अ-ब)** | **१९००.९९** |

वित्तीय वर्ष २००७-०८ मधील लेखा परीक्षणानुसार बेस्टचे रु. २३२८.९४ (कोटी) वजा विदयुत शक्ती प्रोत्साहन रु. ८.१६ (कोटी) इतका अपेक्षित ढोबळ महसूल आहे. वित्तीय वर्ष २००७-०८ साठी निव्वळ महसूल रु.२३२०.७८ एवढे आहे. म्हणून वित्तीय वर्ष २००७-०८ साठी महसूल तूट

= रु. २६२२.५३ कोटी - रु. २३२०.७८ कोटी

= रु. ३०१.७५ कोटी.

## वित्तीय वर्ष २००८-०९ करिता वार्षिक कामगिरी पुनर्विलोकन व वित्तीय वर्ष २००९- १० करिता वार्षिक महसुली आवश्यकता:

**<u>मागणी अंदाज</u>** :-

यापूर्वीच्या वीजग्राहक आणि विक्रीमधील वाढीच्या कलानुसार मा. आयोगाने वित्तीय वर्ष २००७-२००८ चे वार्षिक पुनर्विलोकन व वित्तीय वर्ष २००८-२००९ च्या बेस्टचे वीजदर निर्धारित याचिकेवर मा. आयोगाचे दिनांक ६ जून, २००८ च्या आदेशान्वये वित्तीय वर्ष २००८-२००९ साठभ ४३६३.३७ एवढी पण प्रत्यक्षात एप्रिल-सप्टेंबर २००८ मध्ये २१३६.०७ एवढी ऊर्जा विक्री झालेली आहे. म्हणून, बेस्ट उपक्रम चालू वर्षाच्या उर्वरित

महिन्याकरिता सुधारित विक्रीचे अंदाज चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्याकरिता प्रत्यक्ष विक्रीतील विक्रीतील वाढ विचारात घेऊन अंदाजित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

हया प्रयोजनार्थ बेस्ट उपक्रमाकडून करण्यात आलेल्या एकूण वार्षिक विद्युत खरेदीच्या तुलनेत सरासरी मासिक विद्युत ऊर्जा खरेदीची ६ वर्षाच्या सरासरी आधारावर विक्री अंदाजित करण्यात आली आहे. पहिल्या व दुस-या सहा महिन्याचे गुणोत्तर ५२.२६%, ४७.७४% आहे. त्याप्रमाणे वित्तीय वर्ष २००८-२००९ च्या दुस-या सहा महिन्याच्या विक्री १९५०.४१ एम.यु. एवढी असेल.(वित्तीय वर्ष २००८-०९ च्या दुसऱ्या सहा महिन्याच्या विक्री = पहिल्या सहा महिन्याच्या विक्री / ५२.२६% * ४७.७४ म्हणजे ( २१३५.०९ / ५२.२६% * ४७.७४% = १९५०.४१ )

वित्तीय वर्ष २००९-१० साठी विक्री संकल्पित करताना, बेस्टने वार्षिक वाढीचा देय वेग (CAGR) मागिल ५ वर्षाचा उर्जा विक्री आधार म्हणून मानले आहे. हा सीएजीआर (४.२%) वाढीचा घटक समजून वित्तीय वर्ष २००९-१० साठी अंदाजीत मागणी ४२५७.११ एम यु एवढी असेल. बेस्टने गृहित धरलेले व मागील प्रथेनुसार व चालू मागणीच्या निरीक्षणाच्या आधारे ही वाढीव मागणी त्या त्या प्रवर्ग /टप्प्याच्या वैयक्तीक वाढीच्या आधारे त्याला दर प्रवर्गाला / टप्प्याला योग्य रितीने विभागून दिले आहे.

**<u>प्रवर्गानुसार ऊर्जा युनिट वापर (एमयू)</u>**

| प्रवर्ग | वित्तीय वर्ष २००७-२००८ | वित्तीय वर्ष २००८-२००९ (अंदाजित) | | | वित्तीय वर्ष २००९-२०१० (अंदाजित) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रत्यक्ष | एपीआर २००७-२००८ च्या याचिकेनुसार मान्यताप्राप्त | सप्टेंबर २००८ पर्यंत प्रत्यक्ष व ऑक्टोबर २००८ पासून अंदाजित | वाय-ओ-वाय वाढ | एमवायटी याचिकेनुसार संकल्पित केलेले | सुधारित संकल्पना | वाय-ओ-वाय वाढ |
| निवासी | १७२४.२३ | १८५५.८५ | १७७०.९० | २.७% | १८१९.३२ | १८३३.२४ | ३.५२% |
| वाणिज्यिक | १८८५.६५ | २११५.६७ | १९२९.०० | २.३% | १९०६.१९ | २०३३.०५ | ५.३९% |
| औद्योगिक | ३६१.८० | ३४३.६८ | ३४३.१५ | -५.१५% | ३४५.४२ | ३४८.४३ | १.५४% |
| इतर | ५२.२६ | ४८.१७ | ४२.४६ | -१८.८% | ७१.८६ | ४२.३८ | -०.१९% |
| एकूण | ४०२३.९४ | ४३६३.३७ | ४०८५.५२ | १.५३% | ४१४२.७९ | ४२५७.११ | ४.२०% |

**<u>वितरण हानी</u>** :

बेस्ट उपक्रमाने २००८-२००९ या वित्तीय वर्षामध्ये विद्युत पुरवठा वितरणातील हानी निम्नतर पातळीवर राखण्याचे पुढे चालू ठेवले आहेत. वित्तीय वर्ष २००८-०९ च्या २३७१.२१ एम यू, T &D Interface कडे एकुण उर्जा आवश्यकतेच्या तुलनेत वित्तीय वर्ष २००८-०९ च्या पहिल्या सहा महिन्यात एकुण २१३६.०७ एम यू एवढी विक्री नोंदविण्यात आली व निर्धारीत वितरण हानीची मर्यादा ही १०.५% च्या तुलनेत पहिल्या सहा महिन्यात चालू वितरण हानी ९.९०% आहे. तथापी अंदाजीत उर्जा आवश्यकतेच्या कारणास्तव उपक्रमाने १०.५% वितरण हानी मान्य केली आहे, जी मा.आयोगाने मान्य केलेल्या मार्गाला अनुसरून आहे.

वित्तीय वर्ष २००९-१० साठी बेस्टने आपल्या मुळ प्रस्तावात वितरण हानीचे लक्ष ११% एवढे केले आहे. परंतु मा. आयोगाने आपल्या निर्देशात हे लक्ष १०% एवढे ठेवले आहे. बेस्ट उपक्रम आयोगाने मान्य

केल्यानुसार वितरण हानीचे लक्ष गाठण्यास प्रयत्नशील आहे. बेस्ट ने इतर प्रयोजनासाठी १०.५% एवढे वितरण हानीची गणना केली आहे.

**<u>वित्तीय वर्ष २००८-०९ व २००९-२०१० करिता ऊर्जा संतुलन खालीलप्रमाणे</u> :-**

| तपशील | वित्तीय वर्ष २००८-०९ | वित्तीय वर्ष २००९-१० |
|---|---|---|
| ऊर्जा मागणी (एमयू) | ४०८५.५१ | ४२५७.११ |
| वितरण हानी (%) | १०.५% | १०.५% |
| ऊर्जा आवश्यकता (एमयू) <u>आणि टी आणि डी</u> ****** | ४५६४.८ | ४७५६.५४ |
| पारेषण हानी (%) | ४.८५% | ४.८५% |
| एकूण ऊर्जा खरेदी (एमयू) | ४७९७.५ | ४९९९ |

**<u>ऊर्जा खरेदी :</u>**

**<u>वित्तीय वर्ष २००८-०९</u>**

टीपीसी (निर्मितीचे) युनिट क्र.७ मधून स्वस्त दराने बेस्टला वीज पुरवठा होतो. वित्तीय वर्षं २००८-०९ च्या पहिल्या सहा माहित टीपीसी (निर्मितीचे) युनिट क्र.७ एकूण ८४ दिवस (२३%) दि. २० जुलै २००८ ते १५ ऑक्टोबर २००८ बंद ठेवावी लागल्या कारणाने, ही निर्मिती <u>हानी</u> महागड्या युनिट क्र.४ कडून भरुन काढण्यात आली. त्याच वेळी अभूतपुर्व इंधन दराच्या वाढीमुळे युनिट क्र.४ देखील १५ दिवस ( दि.८ जून २००८ ते २३जून २००८) बंद ठेवण्यात आले. या दोन्ही कारणास्तव बेस्ट च्या प्रति युनिट खर्चा मध्ये वाढ झाली आहे.

सुदैवाने चालु वर्षाची संकल्पित मागणी ही (४०८५.५ एम.यु.) आयोगाने मान्य केलेल्या ४३६३ एम.यु. च्या तुलनेत कमी आहे, तरी देखील उर्जा खरेदीच्या खर्चात चालु वर्षात वाढ अपेक्षीत आहे.

इंधन समायोजन आकारात झालेली वाढ जानेवारी २००८ पासून टी.पी.सी. कडून आकारण्यात येणाऱ्या इंधन समायोजन आकारात उत्तरोत्तर वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे आणि हा कल वित्तीय वर्ष २००८-०९ मध्ये ही जागतिक पातळीवर तेलांच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे कायम आहे. या कारणास्तव, आयोगाने टी.पी.सी.(जी) च्या निर्धारीत केलेल्या रू.३.३२५४ प्रतियुनिट इतक्या वीज खरेदी खर्चाच्या दराच्या व्यतिरीक्त इंधन समायोजन आकाराने रू.१.८५ प्रतियुनिट इतकी पातळी गाठली. याशिवाय टाटाचे युनिट ७ बिघाडामुळे बंद होते: इंधनाच्या किंमती वाढल्यामुळे युनिट ४ मधील वीजेचे उत्पादन बंद होते ज्यामुळे आयोगाने निर्धारीत केलेल्या दरापेक्षा जास्त दराने वीज खरेदी करणे भाग पडले असते आणि म्हणून कमाल आवश्यकतेवेळेची वीजेची गरज व उपलब्धता यातील तूट भरून काढण्यासाठी आवश्यक असलेली वीज बाह्य स्त्रोतांकडून महागड्या दराने वीज खरेदी करणे क्रमप्राप्त ठरले.

मा.आयोगाने दि.६जून २००८ रोजीच्या आदेशात २९७.१४ एम यु इतक्या अतिरीक्त वीजेच्या विक्रीचे अंदाज गृहित केले आहेत आणि आयबीएसएम मार्फत विक्री करण्यात येणाऱ्या या अतिरीक्त विजेच्या विक्रीचे अंदाज गृहित केले आहेत आणि आयबी एस.एम. मार्फत विक्री करण्यात येणा-या या अतिरिक्त वीज विक्रीचे उत्पन्न एकूण वीज खरेदी खर्चातून वगळण्यात आले आहेत. ज्यामध्ये युनिट ८ मधील रु.२.८५ प्रति युनिट दराने ३५९.५४ एम यु इतक्या उत्पादित विजेचा समावेश होता. परंतु, युनिट ८ अद्याप कार्यान्वित न झाल्यामुळे युनिट ८ चे उत्पादन अतिरिक्त स्वरुपात बेस्टला अजून प्राप्त झालेले नाही. तथापि, वित्तीय वर्ष २००८-२००९ मध्ये

आयोगाने निर्धारित केलेल्या अनुमानापेक्षा युनिट विक्री कमी झाल्यामुळे आणि तसेच निर्धारित पातळीपेक्षा वितरण हानीची पातळी कमी झाल्यामुळे एकूण वीज खरेदी युनिटमध्ये कपात झाली आहे.

मा. आयोगाने असे नमूद केले होते की, उपक्रमास आयबीएसएमच्या मार्फत अतिरिक्त वीज विक्रीमधून उत्पन्न मिळेल. याठिकाणी लक्षात घेणे जरुरीचे आहे की, टीपीसीचे युनिट ७ वर स्पष्ट केल्यानुसार वीज निर्मितीसाठी उपलब्ध नसल्यामुळे आणि युनिट ८ ची उपलब्धता उर्वरित वित्तीय वर्षाच्या कालावधीमध्ये अनिश्चित असल्याकारणामुळे आयबीएसएममार्फत उपक्रमास मिळावयाच्या उत्पन्नाबाबत फारच कमी शक्यता आहे. आजतागायत जे काही आयबीएसएममार्फत उपक्रमास उत्पन्न प्राप्त झाले आहे त्याच्यापेक्षा जास्त रक्कम उपक्रमाने कमाल मागणीच्या वेळी वीज तूट भरुन काढण्यासाठी महागडया वीज खरेदीसाठी खर्च केली आहे आणि म्हणून आयोगाने अनुमानित केलेल्या अतिरिक्त वीज विक्रीचे उत्पन्न प्रत्यक्षात उतरु शकलेले नाही.

**वित्तीय वर्ष २००८ -०९ करिता मान्यता व प्रत्यक्ष ऊर्जा खरेदी खर्च दर्शविणारा तक्ता.**

| तपशील | २००८-०९ करिता मान्य केलेले | | दर / युनिट | वित्तीय वर्ष २००८-०९ | | दर / युनिट |
|---|---|---|---|---|---|---|
| | एमयू | रु.(कोटी) | | एमयू | रु.(कोटी) | |
| टीपीसीजीकडून एकूण | ५१६४.९४ | १६६१.५६ | ३.२२ | ४६५५.६७ | २०१४.६३ | ४.३३ |
| अतिरिक्त ऊर्जा खरेदी/विक्री | ० | ० | ०.०० | ३३५.८४ | २८४.५४ | ८.४७ |
| ऊर्जा खरेदी/विक्री | -२९७.१४ | -१६३.४३ | ५.५० | -२५३.३० | -२१७.४८ | ८.५९ |
| नवीकरणक्षम ऊर्जा स्त्रोत | २५६.२ | ८९.६७ | ३.५० | ५९.२९ | ३१.३५ | ५.२९ |
| **एकूण ऊर्जा खर्च** | **५१२४** | **१५८७.८** | **३.१०** | **४७९७.५०** | **२११३.२४** | **४.४०** |
| राखीव आकार | | १०८.७८ | ०.२३ | | १०८.७८ | ०.२३ |
| वजाः हायडल सूट | | -४४.८५ | -०.०९ | | -४४.८४ | -०.०९ |
| पारेषण आकार | | १०९.६१ | ०.२३ | | १०९.६१ | ०.२३ |
| एसएलडीसी आकार | | ०.७४ | ०.००२ | | ०.७४ | ०.००२ |
| औष्णिक प्रोत्साहन | | १५.५३ | ०.०३ | | १५.५३ | ०.०३ |
| खर्चामधील कपात | | -३.३८ | -०.०१ | | ०.०० | ०.०० |
| स्थिर खर्च | | २८१.८९ | ०.५९ | | २४३.१२ | ०.५१ |
| **एकूण** | **५१२४** | **२०५६.१२** | **४.०१** | **४७९७.५०** | **२५४६.१८** | **५.३१** |

**वित्तीय वर्ष २००८-०९ करिता मूळ इंधन समायोजन आकाराचा प्रति युनिट खर्च दर्शविणारा तक्ता.**

| **तपशील** | **वित्तीय वर्ष २००८-०९ करिता एच-१** | | **वित्तीय वर्ष २००८-०९ करिता एच-२** | | **एकूण** | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **ऊर्जा** | **इंधन समायोजन आकार** | **ऊर्जा** | **इंधन समायोजन आकार** | **ऊर्जा** | **इंधन समायोजन आकार** |
| रु.(कोटी) | ८०१.१० | ३३३.०५ | ७४७.०९ | १३३.५८ | १५४८.१९ | ४६६.६३ |
| युनिट खरेदी | २४०९.०४ | २४०९.०४ | २२४६.६३ | २२४६.६३ | ४६५५.६७ | ४६५५.६७ |
| दर / युनिट | ३.३३ | १.३८ | ३.३३ | ०.५९ | ३.३३ | १.०० |

## वित्तीय वर्ष २००९-१०

उर्जा विक्रीचे पुर्वानुमान आणि मान्य केलेले एकंदरीत वितरण हानी १०.५% व पारेषण हानी ४.८५%च्या आधारे बेस्टला अंदाजीत ४९९९ एमयु उर्जाची आवश्यकता वित्तीय वर्ष २००९-१० साठी आहे.

टाटा वीज कंपनी (टीपीसी) (निर्मिती)च्या वीज उत्पादनाचा खर्च प्रति युनिट रू.३.१८/- युनिट एवढा गृहीत धरला आहे. हा टीपीसी(जी) चा युनिटचा सरासरी दर आहे. बाह्य स्त्रोताकडून खरेदी प्रति युनिट रू.८.२/- सपुर्ण वर्षासाठी, गृहीत धरली आहे. जी वित्तीय वर्ष २००८-०९ च्या पहिल्या सहामाहीचा सरासरी खर्च आहे. टीपीसी-जी च्या वार्षिक कामगीरीच्या आढाव्यानुसार वित्तीय वर्ष २००९-१० चा स्थिर आकार सुधारित करण्यात आला आहे. वित्तीय वर्ष २००८-०९ च्या टिपीसी जी च्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्यानुसार टपीसी-जी ला २००९-१० मध्ये द्यावा लागणारा स्थिर आकार अंदाजित नमुद करण्यात आला आहे. एकूण अंदाजित स्थिर आकार रू.९५४/- कोटी आहे आणि त्यामधील बेस्टचा भाग रू.४२९.५० कोटी (४५.०२)% एवढा आहे. वित्तीय वर्ष २००८-०९ चा स्थिर आकार रू.२४३.१२ कोटी आहे. ह्यामुळे स्थिर आकार रू १८६.३८ कोटींने ह्यावर्षी वाढला आहे.

आयोगाचा वितरण परवानेधारकांना त्यांच्या उर्जच्या आवश्यक्यतेनुसार ६% उर्जा ही नाविन्यक्षम स्त्रोताकडून घेण्याचा निर्देश आहे. त्यानुसार बेस्टला नविनक्षम स्त्रोतांकडून २९९.९४ एमयू उर्जेची आवश्यकता संकल्पित केली आहे. विद्यमान दरानुसार नविनक्षम उर्जेचा दर हा रु.५/युनिट अदांजित करण्यात आला आहे.

### एटीईच्या १२ मे २००८ च्या निकालाचा परिणाम

टीपीसी-जी च्या वित्तीय वर्ष २००८-०९ च्या वार्षिक कामगीरीच्या आढाव्याच्या याचिकेवरून असे समजले आहे की एकूण रू.५७९ कोटी वसूल करण्याच्या रकमेपैकी बेस्टने रू.२१८/- कोटी, वित्तीय वर्ष २००४-०५ आणि वित्तीय वर्ष २००५-०६ च्या अनुक्रमे त्या वर्षातील, एकूण विक्रीच्या गुणोत्तरानुसार प्रदान करण्याचे आदेश देण्यासंबंधी टाटा पॉवर ने माननीय आयोगास विनंती केली आहे. एटीईच्या १२ मे २००८ च्या निकालानुसार टीपीसी-जी ला वसुली करण्यास मान्यता देण्यात आली आहे. याच्या आधारे बेस्टने वित्तीय वर्ष २००९-१० करिता वार्षिक महसुली आवश्यकतेमध्ये एकाच वेळी प्रदान करण्यात येणाऱ्या रू.२१८/- कोटी अंतर्भुत केले आहेत. ह्यासंबंधीचे स्पष्टीकरण मुख्य याचिकेमध्ये देण्यात आले आहे.

**वित्तीय वर्ष २००९-१० करिता अंदाजीत ऊर्जा खरेदी खर्च :-**

| तपशील | सुधारित<br>वित्तीय वर्ष २००९-१० |
|---|---|
| टाटा पॉवर कंपनी- ऊर्जा निर्मिती यांना देय असणारे स्थिर आकार | ४२९.५० |
| टाटा पॉवर कंपनी- ऊर्जा निर्मिती यांना देय असणारे ऊर्जा आकार | १३५६.२८ |
| बाहय खरेदी | ३५५.१६ |
| टाटा पॉवर कंपनी- ऊर्जा निर्मिती यांना देय असणारे प्रोत्साहन आकार (जल + औष्णिक) | १५.५३ |
| नवीकरणक्षम ऊर्जा स्त्रोत (आरपीएस) | १४९.९७ |
| एसएलडीसी आकार | ०.७४ |
| (वजा) हायड्रो पिकींग टॅरिफमुळे सुट | -४४.८५ |
| एमएसडीसीएल यांना देय असणारे राखीव आकार | १०८.७८ |
| एमएसटीसीएल यांना असणारे आंतर राज्य पारेषण आकार | १०९.६१ |
| एटीईच्या १२ मे २००८ च्या निकालाचा परिणामा मुळे | २१८.०० |
| **एकूण ऊर्जा खरेदी (एमयू)** | **२६९८.७२** |

**पारेषण आकार :-**

वित्तीय वर्ष २००८-०९ मध्ये प्रत्यक्ष पारेषण आकार रु.१०९.६१ कोटी आहे. (आयोगाच्या दि.६ जुन २००८ आदेशानुसार) वित्तीय वर्ष२००९-१० च्या पारेषण खर्चाचा अंदाज घेताना वित्तीय वर्ष २००८-०९ च्या आकारातील वाढ विचारात घेण्यात आलेली नाही. वित्तीय वर्ष २००९-१० मध्ये अंदाजीत पारेषण आकार रू.१०९.६१ कोटी आहे.

**राखीव आकार** :-

वित्तीय वर्ष २००८-०९ मध्ये रु.१०८.७८ कोटी एवढा प्रत्यक्ष राखीव आकार आहे (आयोगाच्या दि.६ जुन २००८ आदेशानुसार ) वित्तीय वर्ष २००९-१० चा राखीव आकाराचा अंदाज घेताना आकारातील वाढ विचारात घेण्यात आलेली नाही. वित्तीय वर्ष २००९-१० मध्ये अदांजीत राखीव आकार रू.१०८.७८ कोटी आहे.

**एसएलडीसी आकार** :-

वित्तीय वर्ष २००७- ०८ चा वार्षिक कामगिरी आढावा व वित्तीय वर्ष २००८-०९ च्या बेस्टचे वीजदर निर्धारित याचिकेवर मा. आयोगाचे दिनांक ६ जून, २००८ च्या आदेशान्वये एसएलडीसी आकार म्हणून रु.०.७४ कोटी तात्पुरत्या स्वरुपात मान्य केले आहे आणि वित्तीय वर्ष २००८- ०९ साठी अंदाजित खर्च हा रु.०.७४ कोटी एवढाच आहे. वित्तीय वर्ष २००९- १० साठी अंदाजित एसएलडीसी आकार हा रु.०.७४ कोटी आहे.

**२००८- ०९ या वित्तीय वर्षामधील कालावधीकरिताचा प्रवर्तन व देखभाल खर्च (रु. कोटींमध्ये)**

प्रवर्तन व देखभाल खर्चामध्ये पुढे नमूद केल्यानुसार, कर्मचारी खर्च, प्रशासकीय व सर्वसाधारण खर्च व दुरुस्ती आणि देखभाल खर्च याबाबींचा समावेश आहे :

| तपशील | वित्तीय वर्ष २००८-२००९ | | वित्तीय वर्ष २००९-२०१० |
|---|---|---|---|
| | मान्यताप्राप्त | सुधारित खर्च | सुधारित अंदाज |
| कर्मचाऱ्यांकरिता खर्च | १३०.८९ | १५५.०६ | १७१.३ |
| प्रशासन व सर्वसाधारण खर्च | ८५.२३ | ८३.५३ | ८८.७ |
| दुरूस्ती व देखभाल खर्च | २८.०३ | ३३.४२ | ३४.७ |
| प्रवर्तन व देखभालीकरिताचा एकूण खर्च. | २४४.१४ | २७२.०१ | २९४.७ |

**कर्मचा-यांवरील खर्च** :-

वित्तीय वर्ष २००८-०९ करिता कर्मचा-यांवरील अंदाजित खर्च रु.१५५.०६ कोटी जो वित्तीय वर्ष २००७-०८ पेक्षा रू. ४.७१ कोटी रूपयांनी जास्त आहे. (रु.१५०.३५ कोटी) चालू वित्तीय वर्ष २००८-०९ मध्ये १०० कर्मचा-यांना नियमित केल्यामुळे हा खर्च वाढला आहे. बाकी सर्व खर्च मागील वर्षानुसार आहे. वित्तीय वर्ष २००९-१० साठी कर्मचा-यांवरील अंदाजित खर्च हारु.१७१.३० कोटी असेल. हा खर्च येणा-या वर्षात वेतन करारामुळे संभावित आहे.

**प्रशासन व सर्वसाधारण खर्च :-**

वित्तीय वर्ष २००८-०९ मधील प्रशासन व सर्वसाधारण खर्चात थोडी वाढ होण्याचे कारण चालू वर्षात झालेल्या महागाईमुळे दिसते. वाढत्या महागाई आलेखानुसार वित्तीय वर्ष २००९-१० मध्ये रू.८८.७० कोटी अंदाजीत खर्च अपेक्षीत आहे.

**दुरूस्ती व देखभाल खर्च:-**

जालव्युहजाळे विस्तारामुळे वित्तीय वर्ष २००८-२००९ मध्ये दुरूस्ती व देखभालीच्या खर्चात थोडी वाढ झालेली आहे. वित्तीय वर्ष २००८-२००९ व २००९-१० साठी सुधारीत प्रवर्तन व देखभाल खर्च अनुक्रम रू.३३.४२ कोटी व रू.३४.७० कोटी एवढा आहे.

**आयकर:-**

आयकर अधिनियमाच्या कलम १०(२०) अन्वये स्थानिक प्राधिकरणाचे उत्पन्न वगळण्यात आले आहे.

**भांडवली खर्च**

बेस्ट ने वित्तीय वर्ष २००८-०९ व २००९-१० साठी आपल्या भांडवली खर्चात सुधारणा केली आहे. एप्रिल २००८ ते सप्टेंबर २००८ दरम्यान बेस्टने रु ३४.१५ कोटी एवढा भांडवली खर्च केला आहे. सुधारीत भांडवली खर्च खालील तक्त्यामध्ये दर्शवीला आहे. (रू. कोटीमध्ये)

| अ.क्र. | प्रकल्प योजना | वित्तीय वर्ष २००८-२००९ (अंदाजित) | | | वित्तीय वर्ष २००९-२०१० (अंदाजित) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बहुवर्षीय वीजदर सादरिकरण | सुधारित सादरिकरण | प्रत्यक्ष भांडवली खर्च सप्टेंबर ०८ पर्यंत | बहुवर्षीय वीजदर सादरिकरण | सुधारित सादरिकरण |
| १ | नवीन विद्युत संग्राही केंद्र (११० केव्ही एसबीएम आणि ३३-२२/११ केव्ही) | २७.९० | ७०.२७ | ४.२० | ३५.८० | ४४.७९ |
| २ | विद्यमान विद्युत संग्राही उपकेंद्रामध्ये वाढ करणे व पुनःस्थापन | १५.१५ | १०.३२ | २.०७ | २३.०६ | ११.३५ |
| ३ | नवीन वितरण उपकेंद्र आणि विद्यमान वितरण उपकेंद्रामध्ये वाढ व फेरफार | ६१.९२ | ५२.१२ | ११.०७ | ५६.१० | ५७.७७ |
| ४ | वितरण जालव्यूहमध्ये वाढ (एचव्ही व एलव्ही तारखंड टाकणे) | ५३.४८ | ३३.०६ | ८.६९ | ५५.८३ | ३६.३६ |
| ५ | स्काडा, डिजिटायजेशन आणि कम्युनिकेशन | ५.७५ | ५४.२७ | ०.०० | १७.६० | २३.८५ |
| ६ | विद्युत ऊर्जा वीजमापके | ८१.३४ | २४.९० | ४.९८ | ७४.८६ | २३.७९ |
| ७ | ऊर्जा निर्मिती केंद्र | ५.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | मार्गप्रकाश (दिवे व तारखंड) | २.७७ | २.७५ | ०.०८ | ३.२६ | ३.०३ |
| ९ | सर्वसाधारण प्रशासनाचा हिस्सा- फर्निचर, कार्यालयीन साधनसामग्री, हत्यारे, स्थापत्य अभियांत्रिकी कामे, मोटार वाहने, इ. | १३.३३ | २१.०० | ३.०६ | १४.५६ | १३.४५ |
| | **एकूण बेरीज :** | २६६.६४ | २६८.६९ | ३४.१५ | २८१.०७ | २१४.३९ |

**घसारा**

वर्षाच्या प्रारंभी वापरात असलेल्या स्थिर मालमत्यांवर स्ट्रेट लाईन पध्दतीच्या आधारे घसारा आकारण्यात आला आहे. बेस्टची वित्तीय स्थिती (रचना) कंपन्यांकडून अनुसरण्यात येत असलेल्या पध्दती प्रमाणे नाही आणि म्हणून वित्तीय वर्ष २००८-०९ करिता नियंत्रण कालावधीसाठी वार्षिक महसूली आवश्यकतांमध्ये घसारा म्हणून बेस्टने अग्रिम रकमेकरिता दावा केलेला नाही. वित्तीय वर्ष २००८-०९ साठी मा. आयोगाने तात्पुरत्या स्वरूपात रु.४४.९० एवढी घसारा रक्कम कोटी मान्य केली आहे तर सुधारीत घसारा रक्कम हि रू.४५.०२ कोटी आहे. वित्तीय वर्ष २००९-१० साठी अंदाजीत घसारा रू.४९.६६ कोटी एवढी आहे.

**घसाऱ्या अंतर्गत आगाऊ रक्कम:**

या तरतूदी अंतर्गत बेस्टने घसाऱ्या अंतर्गत आगाऊ रक्कम वार्षिक महसुली आवश्यकतामध्ये कोणताही दावा केला नाही.

**बुडित कर्जे निर्लेखित करणे** :-

वित्तीय वर्ष २००७-२००८ चा वार्षिक कामगिरी आढावा व वित्तीय वर्ष २००८-०९ च्या बेस्टचे वीजदर निर्धारित याचिकेवर मा. आयोगाचे दिनांक ६ जून, २००८ च्या आदेशान्वये बुडित कर्ज हे रु.०.०८ कोटी मान्य केले आहे. तथापि, बेस्टचे अंदाजित बुडित कर्जे वित्तीय वर्ष २००८-०९ साठी रु.०.१२ कोटी व वित्तीय वर्ष २००९-२०१० साठी रु.०. १३ कोटी एवढे अंदाजित आहे.

**भांडवली कर्जावरील व्याज**

बेस्ट उपक्रमातर्फे भांडवली खर्चा करीता, अतंर्गत निधितून आणि अंशत: बाहेरील स्त्रोताकडून कर्ज उभारुन व्यवस्था करण्यात येते बेस्ट उपक्रमाने, सार्वजनिक कर्जे, मेगासीटी प्रकल्पाकरिता मुंबई महानगर प्रादेशीक विकास प्रधिकरणचे कर्ज, जिल्हा नियोजन विकास परिषद कर्ज आणि गतिमान उर्जा विकास व सुधारणा कार्यक्रमा अतंर्गत कर्जे घेतली आहेत. वित्तीय वर्ष २००८-०९ व २००९-१० करीता अनुक्रमे रू.२४.६ कोटी आणि रू. ३८.६० कोटी एवढे एकूण व्याज म्हणून देणे आहे.

**खेळत्या भांडवलावरील व्याज**

वित्तीय वर्ष २००७-०८ चा वार्षीक कामगिरी आढावा व वित्तीय वर्ष २००८-०९ च्या बेस्टचे वीजदर निर्धारीत याचीकेवर मा. आयोगाचे दि. ६ जून २००८ च्या आदेशानुसार खेळत्या भांडलावरील व्याज हे विद्यमान स्टेट बॅंक ऑफ इंडियाच्या PLR नुसार १२.७५% ऐवढे आहे.

वित्तीय वर्ष २००८-०९ साठी रु.४०.१५ कोटी तर वित्तीय वर्ष २००९-१० साठी रु.२५.९३ कोटी अंदाजीत केले आहे. प्रमाणाकानुसार, वित्तीय वर्ष २००८-०९ आणि वित्तीय वर्ष २००९-१० करिता अंदाजित खेळते भागभांडवल रू. ६.७७ कोटी आणि रू.३.३१ कोटी अनुक्रमे त्या वर्षाकरिता आहे.

**वीजग्राहकांच्या सुरक्षा ठेवी वरील व्याज**

मा. आयोगाने दि.६ जून २००८ च्या आदेशान्वये वीजग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवर ६% च्या दराने व्याज देण्यास अनूज्ञा दिली आहे. वित्तीय वर्ष २००८-०९ व वित्तीय वर्ष २००९-१० साठी वीजग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील अदांजीत व्याज रु.१२.८४ कोटी एवढी आहे.

**भाग भाडंवलावरील परतावा (RoE)**

बेस्ट ने आपल्या सुधारीत अदांजात वित्तीय वर्ष २००८-०९ व वित्तीय वर्ष २००९-१० साठी अनुक्रमे रु.१०९.७६ कोटी व रु.११६.२२ कोटी अदांजीत केले आहेत. याबाबतचा तपशील तक्ता क्र.८ मध्ये देण्यात आला आहे. माननीय आयोगाच्या निर्देशानुसार वरील गुणकाचा तपशिल तक्ता क्रमांक ६२ मध्ये देण्यात आला आहे.

**अंतर्गत निधीवरील परतावा:-**

बेस्ट ने आपल्या सुधारीत अदांजामध्ये वित्तीय वर्ष २००८-०९ व वित्तीय वर्ष २००९-१० करिता अनुक्रमे रु.९.८२ कोटी व रु.१०.७९ कोटी अदांजीत केले आहेत. याबाबतचा तपशील तक्ता क्र.८ मध्ये देण्यात आला आहे. माननीय आयोगाच्या निर्देशानुसार वरील गुणकाचा तपशिल तक्ता क्रमांक ६३ मध्ये देण्यात आला आहे.

**बिगर प्रशुल्क (नॉन-टेरिफ) उत्पन्न :**

मा. आयोगाने वित्तीय वर्षं २००८-०९ मध्ये रु.४९.७२ कोटी बिगर प्रशुल्क उत्पन्नास मान्यता दिली होती, परंतु प्रस्तृत वित्तीय वर्ष २००८-२००९ मध्ये बिगर प्रशुल्क उत्पन्न रु.५०.१३ कोटी एवढे झाले आहे. वित्तीय वर्ष २००९-२०१० करिता बेस्ट ने बिगर प्रशुल्क उत्पन्न रु. ५३.७५ कोटी एवढे अंदाजीत केले आहे.

**वित्तीय वर्ष २००८-०९ करिता अंदाजित महसूली तूट :-**

दि.६ जुन २००८ रोजी आयोगाने वित्तीय वर्ष २००७-०८ च्या वार्षिक महसूली आढावा आणि वित्तीय वर्ष २००८-०९ च्या वीज दरनिश्चितीकरण प्रस्तावावर आयोगाने आदेश दिले. या आदेशाअन्वये रू.३७९.५७ कोटी इतकी रक्कम महसूली शिल्लक अंदाजित करण्यात आली आणि अतिरिक्त रू.१०२.६४ कोटीची वसूली करून महसूली तूट शुन्यावर आणण्यासाठी वित्तीय वर्ष २००७-०८ साठीच्या एकूण वार्षिक महसूली आवश्यकतेची वसूली करणे बेस्ट उपक्रमाला शक्य व्हावे, याकरिता या आदेशात ३.६% दराने वीज दरात वाढ करण्यात आली.

या आदेशामध्ये टी.पी.सी.जी. कडून रू.३८.७६ कोटी एवढी रक्कम वसूल करण्यास बेस्ट उपक्रमास मान्यता देण्यात आली. वित्तीय वर्ष २००८-०९ मध्ये बेस्ट उपक्रमास रू.३८.७६ कोटी टी.पी.सी.जी. कडून प्राप्त झाले. या व्यतिरिक्त बेस्ट उपक्रमास आयबीएसएम कडून रू १४.२६ कोटी इतकी रक्कम हिस्सा म्हणून मिळाली.

## वित्तीय वर्ष २००८-०९ करिता एकूण मान्य असलेली तुट व प्रत्यक्ष तुट

| तपशील | अंदाजित | प्रत्यक्ष | वाढीव |
|---|---|---|---|
| वित्तीय वर्ष २००४-२००५ आणि वित्तीय वर्ष २००५-२००६ मधील खर्चाचे अचूक समायोजन | ७२.६२ | ७२.६२ | ०.०० |
| २००६-२००७ मधील खर्चाचे अचूक समायोजन | २७६.३८ | २७६.३८ | ०.०० |
| २००७-२००८ मधील खर्चाचे अचूक समायोजन | १७१.९७ | ३०१.७५ | १२९.७८ |
| वित्तीय वर्ष २००८-२००९ ची वीज दरवाढीचे अचूक समायोजन | ५२०.९७ | ६५०.७४९ | १२९.७८ |
| वित्तीय वर्ष २००८-२००९ च्या अदाजित महसूली तूट/शिल्लक | -४८२.२१ | २८१.५२ | ७६३.१३ |
| वित्तीय वर्ष २००६-२००७ मध्ये अतिरीक्त रक्कम टी.पी.सी कडून प्राप्त झाली. | -३८.७६ | -५३.०२ | -१४.२६ |
| वसुल न केलेला इंधन समायोजन आकार (दि.०१.१२.०८ चा आयोगाचा आदेश) | ० | -८०.४६ | -८०.४६ |
| **एकूण महसुली तुट** | ०.०० | ७९८.७९ | ७९८.७९ |

मा. आयोगाने ज्या घटना अनुमानीत केल्या, त्याप्रमाणे त्या प्रत्यक्षात साकार झाल्या नाहीत. वित्तीय वर्ष २००८-०९ मध्ये अंदाजित शून्य तूटी ऐवजी निव्वळ तुट हि रू.७९८.७९ कोटी एवढी आहे. हि तुट भरून काढण्यासाठी वित्तीय वर्ष २००९-१० या वर्षाच्या वीजदरात भरणा करण्यात येईल वाढ करणे. खालील बाबी त्यास कारणीभूत आहेत.

१. **वीज खरेदी खर्चामधील बेसूमार वाढ:-**

वीज खरेदी खर्चाचे प्रकरण -३ मध्ये तपशीलवार नमूद केल्या प्रमाणे, वित्तीय वर्ष २००८-०९ मध्ये वीजखरेदी खर्चात बेसूमार वाढ झाली आहे. फेरफारक्षम वीज खरेदीचा खर्च रू.२११३.०४ कोटी इतका अंदाजित करण्यात आला असून मा. आयोगाने मंजूर केलेला फेरफारक्षम वीज खरेदी खर्च केवळ रू. १५८७.८० कोटी इतका आहे. फेरफारक्षम वीज खरेदी खर्चतील एकूण वाढ रू.५२५.४४ कोटी असून, वित्तीय वर्ष २००८-०९ करीता आयोगाने अंदाजित केलेले महसूली शिल्लक रू.३७९.५७. कोटी एवढी आहे.

२. **महसूलातील घट:-**

बेस्ट उपक्रमाने अंदाजीत केलेल्या वीज विक्री पेक्षा प्रत्यक्ष वीज विक्री मध्ये घट आढळून आली आहे. ही एकंदरीत युनिट विक्री मधील घट प्रत्येक उच्चतर वीजदराच्या टप्प्यामधील दरामध्ये भरीव घट केल्यामुळे वाढली आहे. ज्यावर आधारीत आयोगाने बेस्ट उपक्रमाचे महसूली अंदाज निर्धारीत केले होते.

३. **इंधन समायोजन आकाराची कमी प्रमाणात झालेली वसूली** :-

वीज खरेदी खर्च संबंधी प्रकरणात नमूद केल्या प्रमाणे इंधन समायोजन आकारामध्ये ठळकपणे वाढ झाली आहे. तथापि १०% इतक्या मर्यादे(कॅप)मुळे वसूली करण्यासंबंधी विनियमातील तरतूदीनुसार उपक्रमास फक्त काही अंशी इंधन समायोजन खर्चाची वसूली करणे शक्य झाले. उदा. एप्रिल आणि मे २००८ मध्ये

रू.  ०.७० आणि रू.०.९२ प्रती युनिट इतका इंधन समायोजन आकाराचा दर होता. परंतु त्यावेळच्या प्रचलित वीज दरानुसार उपक्रमास रू.०.४५ प्रती युनिट इंधन समायोजन आकाराची वसूली करणे शक्य झाले आणि त्यानंतर जूलै २००८, ऑगष्ट २००८ आणि सप्टेंबर २००८ करीता अनुक्रमे रू.१.८५, रू.१.७७ आणि रू.१.९३ प्रति युनिट दराने टी पी सी जी ला प्रदान केलेल्या इंधन समायोजन आकारा ऐवजी उपक्रमास रू.०.५३६ प्रति युनिट एवढा इंधन समायोजन आकार वसूल करणे शक्य झाले. ज्यामुळे पहिल्या सहा महिन्यासाठी आणि त्यानंतरचा कालावधीसाठी रू.१.२५ प्रति युनिट दराने इंधन समायोजन आकाराची वसूली करणे बाकी आहे.

या बाबींचा उपक्रमाच्या उत्पन्नावर परिणाम झाला आहे. एका बाजूस उपक्रमाच्या नियंत्रणाबाहेरील बाबींमुळे वीजखरेदी खर्चात वाढ  होत असून. दुसऱ्या बाजूस मा.आयोगाने अनुमानित केल्याप्रमाणे उच्च उत्पन्न वीज दराच्या एकूण वीजविक्री मध्ये घट वाढ नाही आणि इंधन समायोजन आकाराच्या अधित्तम वसुली करण्याबाबतचे नियामक तरतूदी यामुळे उत्पन्नात त्याप्रमाणात वाढ नाही.

या संदर्भात आम्ही आमच्या दि. ११ ऑगष्ट २००८ रोजी दाखल करण्यात आलेल्या याचिकेतील मुद्यासंदर्भात  आयोगाचे लक्ष वेधत आहोत.

i) ऑक्टोबर २००७ ते मार्च २००८ या कालावधीसाठी रू.०.६६ प्रति युनिट या दराने ऑगष्ट २००८ ते ऑक्टोबर २००८ या कालावधी मध्ये रू.७४.८० कोटी इतक्या रकमेची इंधन समायोजन आकारापोटी (लागू  असलेल्या वीजदर प्रवर्गाप्रमाणे ) वीजग्राहकांकडून वसूली करण्यासाठी उपक्रमास अनुमती द्यावी.

ii) सध्याच्या १०% मर्यादेवरून वित्तीय वर्ष २००८-०९ करीता इंधन समायोजन आकाराची वसूली करण्यासाठी मर्यादा २०% पर्यंत वाढविण्यात यावी.

iii) आयोगाच्या पूर्वपरवानगीने बेस्ट उपक्रमास प्रत्यक्ष आकारलेल्या इंधन समायोजन आकाराची वसूली करण्यासाठी अनुमती द्यावी.

iv) याचिका दाखल करताना अनवधनाने झालेल्या चूका /त्रुटी या बद्दल सूट द्यावी आणि बेस्ट उपक्रमात या याचिकेत नवीन सुधारणा करण्यास परवानगी द्यावी.

वरील याचिके संदर्भात मा. आयोगाने दि.१  डिसेंबर २००८ रोजी आदेश जारी केले.  याचिकेमधील वर उल्लेख केलेल्या क्र.१ च्या मुद्दयाबाबत आयोगाने दिलेले आदेश खाली उद्धृत केले आहेत.

“आयोगाने बेस्ट उपक्रमाच्या वार्षिक महसूली आढाव्याच्या निवेदनासंदर्भात वित्तीय वर्ष २००७-०८ मधील खर्च आणि उत्पन्न यांचे तात्पुरते सत्यता पडताळणीचे काम हाती घेतले असल्यामुळे  या क्षणी ऑक्टोबर २००७ ते मार्च २००८ या कालावधीसाठी इंधन समायोजन आकारापोटी वसूल न झालेल्या रू.७८.४० कोटी इतक्या रकमेची  प्रतिपूर्ती करणे आवश्यक नाही.  म्हणून आयोगाने आदेश दिले की वसूल न झालेल्या इंधन समायोजन आकाराची नोंद वित्तीय वर्ष २००७-०८ च्या खर्चाची अंतिम सत्यता पडताळणीच्या वेळी घेण्यात येईल, म्हणजेच वित्तीय वर्ष २००८-०९ करीता वार्षिक महसूली आढावा आणि वित्तीय वर्ष २००९-१० चे वीजदर निश्चितीकरण सदर्भात याचिका दाखल करते वेळी जर बेस्ट उपक्रमाने या बाबीं याचिकेत नमूद केल्या असतील तरच विचारात घेतले जाईल.”

परंतु, आयोगाने एप्रिल ते जून २००८ या कालावधीसाठी कमी दराने वसूल करण्यात आलेली प्रत्यक्ष रू.९१.८४ कोटी इतकी रक्कम नोंव्हेबर २००८ ते मार्च २००९ या कालावधी मधील विक्रीवर ५१पैसे / युनिट या दराने वसुली करण्यास मंजूरी दिली आहे.

बेस्ट उपक्रमाने पाच महिन्याच्या कालावधी मध्ये म्हणजेच नोव्हेंबर २००८ ते मार्च २००९ या कालावधी मध्ये रू.९१.८४ कोटी ऐवजी रू.८०.४६कोटी एवढ्या रक्कमेची वसूली करता येईल असा अंदाज केला आहे. कारण बेस्ट ने या कालावधीचे अंदाजित केलेली विक्री १५७७.६४ एम यु झाली आहे. (१५७७.६४ x ०.५१/१० = ८०.४६) म्हणून महसूली तुटीचा अंदाज दर्शविताना रू. ८०.४६ कोटी इतकी रक्कम विचारात घेण्यात आली आहे याची या ठिकाणी नोंद घ्यावी.

**वित्तीय वर्ष २००८-०९ व २००९-१० या वर्षाचा वार्षिक महसूला आवश्यक्यतेचा सारांश (रु.कोटींमध्ये).**

| अनु. क्र. | तपशील | वित्तीय वर्ष २००८-०९ | | वित्तीय वर्ष २००९-१० |
|---|---|---|---|---|
| | | आदेशानुसार | सुधारित अंदाज | सुधारित अंदाज |
| १ | विद्युत ऊर्जेच्या खरेदीचा खर्च (@) | १८३७.०५ | २३२७.०५ | २४७९.५ |
| २ | प्रवर्तन व परिरक्षण खर्च | २४४.१५ | २७२.०१ | २९४.७० |
| (ए) | कर्मचारी खर्च | १३०.८९ | १५५.०६ | १७१.३० |
| (बी) | प्रशासन व सर्वसाधारण खर्च | ८५.२३ | ८३.५३ | ८८.७० |
| (सी) | दुरूस्ती व देखभाल खर्च | २८.०३ | ३३.४२ | ३४.७० |
| ३ | घसाऱ्यानुसार आगाऊ रकमेसह | ४४.९० | ४५.०२ | ४९.६६ |
| ४ | दीर्घ मुदतीच्या कर्ज भांडवलावरील व्याजाची रक्कम | ४.३८ | २४.६२ | ३८.६० |
| ५ | खेळत्या भांडवलावरील व्याज | १५.६८ | ६.७७ | ३.३१ |
| ५.१ | खेळत्या भांडवलावरील व्याज (प्रत्यक्ष प्रमाणकानुसार) | ०.०० | ३३.३८ | २२.६२ |
| ६ | वीजग्राहक सुरक्षा ठेवीवरील व्याज | १२.४६ | १२.८४ | १२.८४ |
| ७ | बुडित कर्ज निर्लेखित करणे. | ०.०८ | ०.१२ | ०.१३ |
| ८ | आयकर | ०.०० | ० | ०.०० |
| ९ | एमएसइटीसीएल यांना प्रदान करण्यात आलेले राखीव आकार. | १०८.७८ | १०८.७८ | १०८.७८ |
| १० | एमएसइटीसीएल यांना प्रदान करण्यात आलेले पारेषण आकार. | १०९.६१ | १०९.६१ | १०९.६१ |
| ११ | एसएलडीसीचे वार्षिक शुल्क व आकार | ०.७४ | ०.७४ | ०.७४ |
| १२ | **एकूण महसुली आवश्यकता.** | **२३७७.८** | **२९४०.९०** | **३१२०.५८** |
| १३ | भागभांडवलावरील परतावा | १०५.५४ | १०९.७६ | ११६.२२ |
| १४ | अंतर्गत निधीवरील व्याज म्हणून परतावा. | ९.११ | ९.८२ | १०.७९ |
| १५ | **एकूण महसुली आवश्यकता.** | **२४९२.५** | **३०६०.५०** | **३२४७.५९** |
| १६ | (वजा) बिगर प्रशुल्क उत्पन्न | ४९.७२ | ५०.१३ | ५३.७५ |
| १७ | किरकोळ विजदपत्रका पासुन एकुन महसुली आवश्यकता | २४४२.८ | ३०१०.३९ | ३१९३.८४ |
| १८ | किरकोळ विजदरपत्रका पासुन मिळणारा महसुल | | २७२८.८७ | २६३१.०५ |
| १९ | **तूट** | | **२८१.५२** | **५६२.७९** |

# वित्तीय वर्ष २००८-०९ अणि वित्तीय वर्ष २००९-१० या करीता विदयुत शक्ती प्रोत्साहन ज्नुक्रमे रू ८ कोटी अणि रू.८.५ कोटी ज्हे.

## @उर्जा खरेदी  खर्चाचा सविस्तर तक्ता

| तपशील | रू. कोटी |
|---|---|
| अयोगाने मान्य केलेला एकूण खर्च (अ) | २०५६.१८ |
| वजा: खर्च वेगळा दर्शविलेले अहे. (ब) | |
| एमएसईटीसीएल यांना देय केलेला पारेषण अकार | १०९.६१ |
| एमएसईटीसीएल यांना देय केलेला राखीव अकर. | १०८.७८ |
| वार्षिक एसएलडीसी शुल्क व अकार | ०.७४ |
| **एकूण उर्जा खरेदी केलेला खर्च (अ-ब) ##** | **१८३७.०५** |

## रू.१६३.४३ कोटी शिल्लक गृहीत धरून, जी प्रत्यक्षात रिाहिली नाही, विजेच्या खरेदीवरील नक्त खर्च दाखविण्यात अला अहे.

वित्तीय वर्ष २००८-०९ ची संचित अंदाजित तूट ही रु.७९८.७९ कोटी एवढी अहे. अणि वित्तीय वर्ष २००९-१० साठी वार्षिक महसूल अवश्यकता रू ३९९२.६३ कोटी अहे. यामध्ये संचित तूट म्हणून अंतर्भूत अहे. प्रचलित वीजदरानुसार महसुल हा रु.२६३१.०५ कोटी एवढा अपेक्षित अहे. वित्तीय वर्ष २००९-१० साठी एकूण तूट ही रु.१३६१.५८ कोटी एवढी अहे.

## २००९-१० या वर्षापर्यंत संचित तूट (रु.कोटींमध्ये)

| तपशील | रक्कम (कोटींमध्ये) |
|---|---|
| वित्तीय वर्ष २००८-०९ पर्यंत एकूण संचित तूट | ७९८.७९ |
| वित्तीय वर्ष २००९-१० करिता वार्षिक महसुली अवश्यकता. | ३१९३.८४ |
| वित्तीय वर्ष २००९-१० करिता  एकुण वार्षिक महसुली अवश्यकता. | ३९९२.६३ |
| **वजा**:  विजदपत्रका पासुन मिळणारा महसुल | २३६१.०५ |
| **एकूण संचित तूट.** | **१३६१.५८** |

## वीजदरपत्रकाचे पुनरीक्षण करण्यासंबंधी प्रस्ताव:-

वर निर्देशीत केल्या प्रमाणे वित्तीय वर्ष २००९-१० करिता विद्यमान वीजदररानुसार बेस्ट उपक्रमास रु.१३६१.५८ कोटी रुपयाची महसूली तूट अंदाजीत अहे. उपक्रमाच्या अर्थिक स्थैर्यासाठी हि महसूली तुट भरुन काढणे अती अवश्यक अहे.

प्रस्तुत महसूली तूट इंधनाच्या किंमतीत झालेल्या अभुतपूर्व वाढीमुळे (जे बेस्ट उपक्रमाच्या नियंत्रणात नाही) उर्जा खरेदी खर्च व इंधन समायोजन खर्चामध्ये वाढ झाली अहे. बाह्य उर्जा खरेदीच्या खर्चातील झालेली वाढ प्रतीमहीना अधारीत वसूल करण्याची तरतूद नाही. तथापि वीजग्राहंकाकडून कमाल इंधन समायोजन अकार वसुल करण्याच्या मर्यादेमुळे इंधन समायोजन खर्च पूर्णपणे वसूल करता अला नाही.

## वित्तीय वर्ष २००९-१० च्या वीजदर प्रस्तावाचे ठळक वैशिष्ट:-

महागडी वीज खरेदी करण्यास येणारा खर्च ग्राहकांकडून वसूल करण्यासाठी मा. ञयोगाने विश्वसनियता ञकार तसेच राखीव ञकार वीज ग्राहकांकडून वसूल करण्याची संकल्पना लागू केली ञहे.

बेस्ट ने विश्वसनियता ञकाराव्यतिरिक्त वित्तीय वर्ष. २००७-०८ व २००८-०९ चे वसूल न केलेला इंधन समायोजन खर्च वसूल करण्याकरिता नविन ञधिभार फक्त वित्तीय वर्ष २००९-१० साठीच ञकारण्याचे प्रस्तावित केले ञहे.

## ञर्थिक वर्ष २००९-१० करिता दर प्रस्ताव

| वीजदर प्रवर्ग | युनिट टप्पा | स्थिर ञकार (रु./ महिना) | स्थिर ञकार (रु./ केवीए/ महिना) | ऊर्जा ञकार (रु./ युनिट | राखीव ञकार (रु./ युनीट) | महाग ऊर्जा ञकार (रु./ युनीट) | ञधिभार (रु./ युनीट) | एकूण वीजदर (रु./ युनीट) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| बीपीएल | ०-३० | ३ | | ०.४ | | | | ०.४० |
| एलटी-१ | ०-१०० | २५ | | १.५ | ०.२६ | | ०.६० | २.३५ |
| | १०१-३०० | ५० | | ४ | ०.२६ | | ०.६० | ४.८५ |
| | ३०१-५०० | ७५ | | ५ | ०.२६ | २.६२ | ०.६० | ८.४७ |
| | >५०० | १०० | | ७ | ०.२६ | २.६२ | ०.६० | १०.४७ |
| | | | | | | | | |
| एलटी-२ ए | ०-३०० | २२५ | | ५ | ०.२६ | २.६२ | ०.६० | ८.४७ |
| | ३०१-५०० | २२५ | | ७ | ०.२६ | २.६२ | ०.६० | १०.४७ |
| | ५०१-१००० | २२५ | | ९ | ०.२६ | २.६२ | ०.६० | १२.४७ |
| | >१००० | २२५ | | ९.५ | ०.२६ | २.६२ | ०.६० | १२.९७ |
| | | | | | | | | |
| एलटी-२ बी | सर्व युनिटस् | | २०० | १० | ०.२६ | २.६२ | ०.६० | १३.४७ |
| | | | | | | | | |
| एलटी-२ सी | सर्व युनिटस् | | २०० | ११ | ०.२६ | २.६२ | ०.६० | १४.४७ |
| | | | | | | | | |
| एलटी-३ | सर्व युनिटस् | ३५० | | १५ | ०.२६ | २.६२ | ०.६० | १८.४७ |
| | | | | | | | | |
| एलटी-४ | ०-३०० | ३५० | | ४.५ | ०.२६ | | ०.६० | ५.३५ |
| | ३०१-५०० | ३५० | | ६ | ०.२६ | २.६२ | ०.६० | ९.४७ |
| | ५०१-१००० | ४०० | | ७ | ०.२६ | २.६२ | ०.६० | १०.४७ |
| | >१००० | ४०० | | ८.५ | ०.२६ | २.६२ | ०.६० | ११.९७ |
| | | | | | | | | |
| एलटी-५ ए | सर्व युनिटस | | २०० | ८ | ०.२६ | २.६२ | ०.६० | ११.४७ |
| एलटी-५ बी | सर्व युनिटस | | २०० | ७ | ०.२६ | २.६२ | ०.६० | १०.४७ |
| एलटी-६ | सर्व युनिटस | | २०० | ७ | ०.२६ | २.६२ | ०.६० | १०.४७ |
| एलटी-७ | सर्व युनिटस | १०० | | २ | ०.२६ | | ०.६० | २.८५ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एलटी-८ | सर्व युनिटस | २०० | | १२ | ०.२६ | २.६२ | ०.६० | १५.४७ |
| एलटी-९ | सर्व युनिटस | २०० | | २ | ०.२६ | | ०.६० | २.८५ |
| | | | | | | | | |
| एचटी-२ | सर्व युनिटस | | २५० | ५.७५ | ०.२६ | २.६२ | ०.६० | ९.२२ |
| एचटी-१ | सर्व युनिटस | | २५० | ५.५ | ०.२६ | २.६२ | ०.६० | ८.९७ |
| एचटी-३ | सर्व युनिटस | | २५० | ३.५ | ०.२६ | २.६२ | ०.६० | ६.९७ |

टिप क्र.१ : टी ओ.डी (ToD) दरपत्रकाच्या अटी व शर्ती पुर्वीप्रमाणेच राहतील.

२ : ज्या निवासी वीजग्रहकांने ३ फेज पुरवठा घेतला आहे त्यानां रू १०० प्रति महिना आकारण्यात येईल. १० किलोवॅट करीता रू.१०० किंवा १० किलोवॅट पेक्षा अधिक विद्युत भाराकरीता त्याचा अंशभाग ह्या स्वरूपात अतिरिक्त स्थिर आकार आकारण्यात येईल.

## आर्थिक वर्ष २००९-१० करिता प्रस्तावित दरपत्रकापासून मिळणारा महसूल

| दर प्रवर्ग | स्थिर मागणी आकार (रु. कोटी) | स्थिर के.व्ही.ए. आकार (रु. कोटी) | ऊर्जा आकार (रु. कोटी) | राखीव आकार (रु. कोटी) | महाग ऊर्जा आकार (रु. कोटी) | अधिभार रु./युनिट | एकूण महसूल रु.(कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| बीपीएल | ०.००३ | | ०.००१६ | ०.० | ०.० | | ०.००५ |
| एलटी-१ | ७.३६ | | ९९.९ | १७.० | ०.० | ३९.९ | १६४.१४ |
| | २०.९३ | | २२६.९ | १४.५ | ०.० | ३३.९ | २९६.२२ |
| | ५.५१ | | ८४.४ | ४.३ | ४४.२ | १०.१ | १४८.५० |
| | ५.७८ | | २६०.५ | ९.५ | ९७.५ | २२.३ | ३९५.५६ |
| | | | | | | | |
| एलटी-२ अे | ४९.८४ | | २०५.०५ | १०.५ | १०७.७ | २४.६ | ३९८.१९ |
| | ६.७१ | | ८१.२ | ३.० | ३०.४ | ६.९ | १२८.१८ |
| | ५.६२ | | १३४.९ | ३.८ | ३९.३ | ९.० | १९२.६४ |
| | ४.६८ | | २८२.६ | ७.६ | ७८.० | १७.८ | ३९०.६६ |
| | | | | | | | |
| एलटी-२ बी | ०.०० | ११.०१ | १७१.५ | ४.४ | ४४.९ | १०.३ | २४२.१३ |
| | | | | | | | |
| एलटी-२ सी | ०.०० | ३८.८५ | ६२०.३ | १४.४ | १४७.८ | ३३.८ | ८५५.१४ |
| | | | | | | | |
| एलटी-३ | ०.२५ | | ३.४ | ०.१ | ०.६ | ०.१ | ४.४९ |
| | | | | | | | |
| एलटी-४ | २.९७ | | १०.६ | ०.६ | ०.० | १.४ | १५.५६ |
| | ०.५३ | | ५.४ | ०.२ | २.४ | ०.५ | ९.११ |
| | ०.७७ | | ९.९ | ०.४ | ३.७ | ०.८ | १५.५२ |
| | ०.८५ | | २५.८ | ०.८ | ८.० | १.८ | ३७.२७ |
| | | | | | | | |
| एलटी-५ अे | ०.०० | ४.१६ | ३६.५ | १.२ | १२.० | २.७ | ५६.५२ |
| एलटी-५ बी | ०.०० | ३.०१ | ३३.६ | १.२ | १२.६ | २.९ | ५३.२७ |
| एलटी-६ | ०.०० | २.०७ | १५.८ | ०.६ | ५.९ | १.४ | २५.७१ |
| एलटी-७ | ०.०० | | ०.२ | ०.० | ०.० | ०.१ | ०.३१ |
| एलटी-८ | ०.१३ | | २२.४ | ०.५ | ४.९ | १.१ | २९.०४ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एलटी-९ | ०.०० | | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.०२ |
| | | | | | | | |
| एचटी-२ | ०.०० | २०.२३ | १८४.५ | ८.२ | ८४.१ | १९.२ | ३१६.२ |
| एचटी-१ | ०.०० | १२.३१ | ९७.८ | ४.५ | ४६.६ | १०.६ | १७१.८३ |
| एचटी-३ | ०.०० | ५.२३ | २०.७ | १.५ | १५.५ | ३.५ | ४६.५२ |
| | | | | | | | |
| | ११२ | ९७ | २६३४ | १०९ | ७८६ | २५५ | ३९९२.७२ |

आर्थिक वर्ष २००९-१० करिता वरील दरपत्रकाच्या योजनेनुसार प्राप्त होणारा महसूल प्रस्तावित दरपत्रकानुसार (कमी/जास्त) मिळणाऱ्या महसूलाचा तक्ता

| तपशील | **रु. / कोटी** |
|---|---|
| प्रस्तावित विजदपत्रका पासुन मिळणारा एकूण महसुल | ३९९२.७२२ |
| वित्तीय वर्ष २००९-१० करिता एकुण वार्षिक महसुली आवश्यकता. | ३९९२.६२७ |
| **महसुल (कमी / जास्त )** | **०.०९४** |

**<u>विनंती</u>:**

बेस्ट उपक्रम आपल्या वार्षिक कामगीरी पूर्नविलोकन व वीजदर याचीके द्वारा वित्तीय वर्ष २००७-०८ च्या महसूल व खर्चाचे अचूक समायोजन, वित्तीय वर्ष २००८-०९ च्या मध्यवर्ती वार्षिक कामगीरी पुर्नविलोकन व वित्तीय वर्ष २००९-१० साठीचे वीजदर निर्धारण सादर करीत आहे. मा. आयोगाला खाली नमुद केलेल्या बाबींच्या मान्यतेसाठी विनंती करीत आहेत.

- वित्तीय वर्ष २००७-०८ या वर्षाच्या उत्पन्न व खर्च यांची सत्यता पडताळणी
- वित्तीय वर्ष २००८-०९ करीता सुधारीत वार्षिक महसूली आढावा.
- याचिकेमध्ये विस्तृतपणे नमुद केल्याप्रमाणे मागील वर्षांपासूनची महसूली तूट
- वित्तीय वर्ष २००९-१० करीता याचिकेत नमूद केलेल्या महसूली तूटीसह वार्षिक महसूली आवश्यकता.
- मा. आयोगाच्या निर्देशानुसार बेस्टने विद्युत खरेदीच्या किंमतीमध्ये, टीपीसी-जी च्या वार्षिक कामगिरीचा आढाव्याच्या याचिकेप्रमाणे, बदल अंतर्भुत केले आहेत. आयोगास विनंती करण्यात येते की बेस्टचा वार्षिक कामगीरीचा आढावा निर्धारित करताना टीपीसी-जी च्या आकार आणि दर यास आयोगाने दिलेली मान्यता लक्षात घ्यावी.
- मा. आयोगाने टीपीसी-जी च्या संदर्भात २ फेब्रुवारी, २००९ (बाब क्रंमाक ४६, २००८) चा आदेश दिला आहे. ज्यमधील काही वित्तीय परिणाम कदाचित बेस्टवर लावण्यात येणार आहेत. मा. आयोगास विनंती करण्यात येते की ह्या आदेशामुळे पडणाऱ्या अधिक भाराचा अंतर्भाव करावा.
- अंदाजित महसूली तूट भरून काढण्यासाठी वित्तीय वर्ष २००९-१० करीता प्रस्तावित दरांची अनुसूचि
- याचिका दाखल करताना अनवधनाने झालेल्या चूका त्रुटी या बद्दल सूट द्यावी आणि बेस्ट उपक्रमात या याचिकेत नवीन सुधारणा करण्यास परवानगी द्यावी.
- अशा प्रकरणा परिस्थिति व इतर गोष्टी विचारात घेता, मा. आयोगास योग्य आणि उचित वाटतील असे आदेश व पुढील कार्यवाही करण्यात यावी.

*********